# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे (पावसाळी) अधिवेशन, २०२६

---

### अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

### प्रश्नांची एकूण संख्या - २०

---

### सोलापुर जिल्ह्यातील मातोश्री पाणंद रस्त्यांची कामे पूर्ण करण्याबाबत

**(१) ९८७ (०७-०४-२०२५) श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्ह्यात सन २०२१ ते २०२४ या कालावधीत मातोश्री ग्रामसमृद्धी शेत पाणंद रस्ते योजनेमार्फत मंजूर करण्यात आलेल्या ११३१ किलोमीटरच्या एकूण १०४३ कामांपैकी सद्य:स्थितीत १५ कामे सुरु असून, सदर जुनी कामे पूर्ण झाल्याशिवाय नवीन कामे सुरू करण्यात येऊ नयेत असे आदेश आयुक्त, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना यांनी निर्गमित केल्याचे माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनेमार्फत जुनी कामे पूर्ण होण्याच्यादृष्टीने तसेच मजूरांना रोजगार मिळण्याच्यादृष्टीने नवी कामे सुरु करण्याकरीता शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.भरत गोगावले (१०-०४-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) मजुरांच्या काम मागणीच्या वेळी जुन्या कामांवर मजुर पाठवून जुनी कामे प्राधान्याने पूर्ण करून घेण्याबाबत आयुक्त, नरेगा, नागपूर कार्यालयामार्फत दिनांक ०५/१२/२०२५ रोजीच्या पत्रान्वये निदेश देण्यात आले आहेत. तसेच, शेत/पाणंद रस्त्यांची अपूर्ण असलेली कामे भौतीकदृष्ट्या पूर्ण झाल्यानंतरच संबंधित गावात शेत/पाणंद रस्त्याचे नविन काम सूरू करावे, असे शासन पत्र दिनांक ०९/०५/२०२५ अन्वये सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच मजुरीप्रधान कामे सूरू करण्यास कोणतेही निर्बंध नाहीत.
(३) प्रश्न उद्‍भवत नाही

---

### 'स्वतंत्र क्रीडा धोरणा'ची राज्यात प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत

**(२) १६५६ (२४-०४-२०२५) श्री.मिलिंद नार्वेकर, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याचे 'स्वतंत्र क्रीडा धोरण' जाहीर होऊन १२ वर्षे होऊनही या धोरणातील २० पैकी बहुतांश

शिफारशी अद्यापही अंमलात आल्या नसल्याचे दिनांक ३ फेब्रुवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आवश्यक असलेली यंत्रणा, अधिकारी, कर्मचारी यांचा अभाव दिसून येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन 'स्वतंत्र क्रीडा धोरणा'ची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती सुनेत्रा पवार (२६-०५-२०२६) :** (१) हे खरे नाही.
(२) अंशत: खरे आहे.
(३) नवीन क्रीडा धोरण निर्माण करण्यासाठी समिती गठीत करण्याची कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चिपळूण (जि.रत्नागिरी) शहराच्या विकासाला अडथळा ठरलेल्या पूररेषेचे फेरसर्वेक्षण करण्याबाबत

**(३) २२७५ (१८-०७-२०२५) श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **जलसंपदा(विदर्भ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चिपळूण (जि.रत्नागिरी) शहराच्या विकासाला अडथळा ठरलेल्या पूररेषेचे फेरसर्वेक्षण करण्याचे आदेश तत्कालीन जलसंपदा मंत्री महोदयांनी जलसंपदा विभागाच्या अपर मुख्य सचिवांना दिनांक ३ फेब्रुवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त आदेशांन्वये चिपळूणमध्ये आखण्यात आलेल्या निळया व लाल पूररेषांचे फेरसर्वेक्षणाची कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,
(३) असल्यास, उक्त फेरसर्वेक्षणान्वये चिपळूण शहरातील निळया व लाल पूररेषांमध्ये कोणते बदल सुचविण्यात आले आहेत आणि नवीन पुररेषेच्या अंमलबजावणीबाबत शासनाने कोणता सकारात्मक निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (१५-०६-२०२६) :** (१) अंशत: खरे आहे.

स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मंत्री (जलसंपदा) (विदर्भ, तापी व कोकण पाटबंधारे विकास महामंडळ) यांना दिलेल्या दिनांक २८/१२/२०२४ रोजीच्या निवेदनाच्या अनुषंगाने "उचित कार्यवाही करावी" असे निर्देश दिले आहेत.
(२) पूराचा संभाव्य धोका टाळण्यासाठी पूररेषेच्या आत कोणतेही बांधकाम न होण्याच्या दृष्टीने पूररेषेची आखणी करणे व निषिध्द क्षेत्राचा उपयोग करण्याबाबतच्या मार्गदर्शक सूचना जलसंपदा विभागाच्या शासन निर्णय दिनांक ०३/०५/२०१८ अन्वये निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. तसेच जलसंपदा विभागांतर्गत महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, मेरी नाशिक या संशोधन संस्थेने लाल व निळया पूररेषा

आखणीसंदर्भात त्यांच्या दिनांक १६/११/२०१५ च्या परिपत्रकान्वये तांत्रिक मार्गदर्शक तत्वे प्रसारित केली आहेत. सदर मार्गदर्शक तत्वानुसार राज्यात लाल व निळ्या पुररेषा आखणीची कामे करण्यात येतात.

सदर पुररेषा आखणी जलसंपदा विभागाने यापूर्वीच शासनाच्या प्रचलित नियम / धोरण तांत्रिक मार्गदर्शक तत्वानुसार केली असल्याने पुन:श्च त्याच नियमावर आधारीत पूररेषेचे फेरसर्व्हेक्षण जलसंपदा विभागामार्फत केल्यास सदर आखणी सारखीच येण्याची शक्यता आहे. त्यामुळे सदर नद्यांच्या लाल व निळी पूररेषेचे पुन्हा सर्वेक्षण करण्याबाबत जलसंपदा विभागाचे धोरण नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## खंडाळा - शिरोळ राज्य मार्गाच्या चौपदरीकरणाच्या कामासाठी शेतकऱ्यांच्या शेतातून मुरुम व डबर उत्खनन होत असल्याबाबत

**(४) २९१० (१०-०७-२०२५) श्री. शशिकांत शिंदे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरेगाव (जि.सातारा) तालुक्यात सुरु असलेल्या खंडाळा–शिरोळ राज्य मार्गाच्या चौपदरीकरणाच्या कामाकरीता शेतकऱ्यांच्या शेतजमिनींमधून मुरुम व डबरचा उत्खनन करण्यात येत असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खंडाळा–शिरोळ राज्य मार्गाच्या चौपदरीकरणाच्या कामाकरीता शेतकऱ्यांच्या शेतजमिनींमधून मुरुम व डबरचे उत्खनन करण्यात आल्या प्रकरणी संबंधित प्रांताधिकारी व तहसिलदार यांच्याविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे (१८-०३-२०२६) :** (१) हे खरे नाही.

खंडाळा शिरोळ राज्य मार्गाच्या कामापैकी सातारा जिल्ह्यातील कोरेगांव तालुक्यात तडवळे सं. वाघोली ते रहिमतपूर असे रस्त्याचे काम २०२५ मध्ये सुरु झाले असून पावसाळ्याच्या कालावधीमध्ये काम बंद होते. सदर कामासाठी जिल्हाधिकारी, सातारा, तहसिलदार, कोरेगाव कार्यालयाने संबंधित कंत्राटदारास गट नं.४४९,मौजे एकसळ, ता.कोरेगाव, गट नं.१४०/२, मौजे बिचकुले, ता, कोरेगाव व गट नं.३०८, मौजे भाकरवाडी, ता.कोरेगाव येथे दगड, माती, मुरुम उत्खननाकरीता तात्पुरते परवाने मंजूर केले असून त्यानुषंगाने कंत्राटदाराने ६००० ब्रास करीता स्वामित्वधनाची रक्कम जमा केली आहे. खंडाळा शिरोळ राज्य मार्गाच्या चौपदरीकरणासाठी शेतजमीनीमधून अनाधिकृतरित्या गौण खनिज उत्खनन होत असल्याची तक्रार क्षेत्रिय कार्यालयास प्राप्त झालेली नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे मिरज लोंढा रेल्वे मार्गाची दुहेरीकरण व विदयुतीकरण कामादरम्यान बेकायदेशीर गौण खनिज उत्खनन होत असल्याबाबत

**(५) २९४७ (१०-०७-२०२५) श्री. शशिकांत शिंदे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे-मिरज-लोंढा रेल्वे मार्गाचे दुहेरीकरण व विद्युतीकरण करण्याच्या कामादरम्यान मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर गौण खनिज उत्खनन करण्यात येत असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रेल्वे मार्गालगतच्या वाड्या, वस्त्या व खेडेगावातील शेतकऱ्यांना आमिष दाखवून त्यांच्याकडून परस्पर संमती घेऊन कोट्यवधी रुपयांचे मुरुम व डबर वापरण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर कामासाठी संबंधित स्टोन क्रशर मालकांनी शासनाची रॉयल्टी बुडवून बेकायदेशीर डबर व खडी तयार केल्याचे तसेच कोरेगाव ते कराड दरम्यान रेल्वे दुहेरीकरणाचे काम सुरू आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास,पुणे-मिरज-लोंढा रेल्वे मार्गाचे दुहेरीकरण व विद्युतीकरण करण्याच्या कामादरम्यान मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर गौण खनिज उत्खनन करणाऱ्या तसेच शासनाची रॉयल्टी बुडविणाऱ्या संबंधित कंपन्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे (१८-०३-२०२६) :** (१),(२),(३) व (४) अंशत: खरे आहे.

पुणे-मिरज-लोंढा या रेल्वेमार्गाच्या दुहेरीकरणाच्या कामासाठी तहसिलदार, कोरेगाव, उपविभागीय अधिकारी, कोरेगाव व जिल्हाधिकारी, सातारा कार्यालयाकडे संबंधित कंपन्यांमार्फत सन २०२३ ते २०२५ या कालावधीत गौण खनिजाच्या अनुषंगाने एकूण १३.४५ कोटी इतक्या रकमेचे स्वामित्वधन जमा केले आहे.

तथापि, पुणे-मिरज-लोंढा या रेल्वेमार्गाच्या दुहेरीकरणाच्या कामादरम्यान ७८०३ ब्रास अनधिकृत गौण खनिज उत्खनन व वाहतूकीच्या अनुषंगाने संबंधित कंपन्याविरुध्द रुपये ३.९७ कोटी इतक्या दंडात्मक रकमेचे आदेश पारीत केले असून वसुलीची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वर्धा जिल्ह्यातील निम्न वर्धा प्रकल्पाग्रस्त कुटुंबांना पुनर्वसनामध्ये मिळालेल्या भूखंडावर तुकडेबंदीची अट शिथिल करणेबाबत

**(६) ४२४४ (१७-०७-२०२५) श्री.दादाराव केचे :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वर्धा जिल्ह्यातील निम्न वर्धा प्रकल्पग्रस्त कुटुंबियांना पुनर्वसनाच्या अंतर्गत वाटप करण्यात आलेल्या भूखंडांवरील तुकडेबंदीची अट शिथिल करण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मदत व पुनर्वसन मंत्री यांना दिनांक २ जून,२०२५ रोजी वा त्यासुमारास दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे

काय,
(२) असल्यास, पुनर्वसित कुटुंबियांना भूखंड मिळाल्यानंतर १५ वर्षांनंतर त्यांच्या कुटुंबातील सदस्यसंख्या वाढल्याने संबंधित भूखंड मुलांना वाटप करताना तुकडेबंदीच्या अटीमुळे अडचणी निर्माण झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास स्थानिक लोकप्रनिधींनी दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने तुकडेबंदीची अट शिथिल करण्यासाठी शासनातर्फे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मकरंद जाधव (पाटील) (२४-०२-२०२६) :** (१) होय, सदर निवेदन मा.मंत्री (मदत व पुनर्वसन) यांचे कार्यलयामार्फत दिनांक २७/०६/२०२५ रोजी जिल्हाधिकारी, वर्धा यांना प्राप्त झाले असून त्यावर तपासून सादर करा, असे निर्देश देण्यात आले आहेत.
(२) हे खरे नाही.
(३) पुनर्वसन अधिनियम, १९९९ अनुसूची, भाग चार नुसार जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांचे मार्फत प्रकल्पबाधित व्यक्तीच्या प्रवर्गानुसार भूखंडाचे वाटप करण्यात येते. शेतकरी असलेल्या खातेदारास ३७० चौ. मी. व बिगर शेतकरी असलेल्या खातेदारास १८५ चौ. मी. भूखंड देय आहे.

सदर भूखंड वाटप केल्यानंतर त्यांचे विभाजन करावयाचे झाल्यास संबंधित अर्जदार यांनी सक्षम प्राधिकारी म्हणून संबंधित उपविभागीय अधिकारी, यांचेकडे अर्ज केल्यास त्यास नगर रचना विभागाची मान्यता घेवून भूखंडाचे विभाजन करता येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कोल्हापूर जिल्ह्यातील डोंगरावरील अकेशिया व निलगिरी या विदेशी प्रजातीची झाडे तोडण्याबाबत

**(७) ४७८२ (१४-१२-२०२५) श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्ह्यातील अनेक तालुक्यांत सरकारी डोंगरावर सन १९९० ते १९९४ या कालावधीत शासनामार्फत अकेशिया व निलगिरी या विदेशी प्रजातींची लागवड करण्यात आली असून वाऱ्यांमुळे जुनी झाडे पडण्याचे प्रमाण वाढून झाडे दीर्घकाळ तशीच पडून राहिल्याने तेथील जमीन नापीक होत आहे व या झाडांमुळे जमिनीतील पाण्याच्या पातळीत घट होत असल्याने स्थानिक शेतकऱ्यांना व वन्यप्राण्यांना पाण्याची टंचाई भासत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने माहिती घेऊन अकेशिया व निलगिरी या विदेशी प्रजातीची झाडे तोडुन त्या ठिकाणी स्थानिक व उपयुक्त प्रजातीची लागवड करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक (१७-०६-२०२६) :** (१) कोल्हापूर वन विभागामध्ये सन १९९० ते १९९४ या कालावधीत ॲकेशिया व निलगिरी या वृक्षाची लागवड करण्यात आली होती. कोल्हापूर वनविभागाच्या सन २००८-०९ ते २०१७-१८ कार्य आयोजनेत ॲकेशिया व निलगिरी या जुन्या रोपवनांचे विरलीकरण करणेची तरतूद होती. तथापि, झाडे तोडावयाची क्षमता असणारे जंगल कामगार सोसायटी या विभागात नसल्यामुळे कामे करता आलेली नाही. अलिकडे अतिपावसामुळे व वाऱ्यामुळे जुन्या झाडांची पडझड होत असल्याने आवश्यकतेनुसार पडझड काढणेत येत आहे. झाडांची पाने कुजल्यामुळे जमीन सुपीक होऊन पाणी जमिनीत मुरण्यास मदत होते. त्यामुळे स्थानिक शेतकऱ्यांना व वन्यप्राण्यांना पाणी टंचाई भासण्याचा तसेच जमीन नापीक होणेबाबतचे स्थानिक दस्ताऐवज उपलब्ध नाही.
(२) विद्यमान विदेशी प्रजाती बदलून मौल्यवान प्रजातींचा साठा वाढवणे, सर्व उपलब्ध मौल्यवान प्रजातींच्या पुनरुत्पादनास प्रोत्साहन देणे आणि त्यांची देखभाल करणे, वनप्रजातींची रचना समृध्द आणि सुधारीत करणे, वनक्षेत्रातील माती आणि ओलावा जपणे. या उपाययोजनांच्या अनुषंगाने ॲकेशिया व निलगीरी या वृक्षांचे निर्मुलन झालेनंतर त्याठिकाणी स्थानिक व उपयुक्त प्रजातींची लागवड करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील वाघांची शिकार व अवयव तस्करी रोखण्याबाबत

**(८) ४८८२ (१४-१२-२०२५) श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील वाघांची शिकार व अवयव तस्करी रोखण्यासाठी AI बेस शासनाच्या मालकीची मार्वल कंपनी स्थापन करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कंपनीचे काम फक्त वाघांची शिकार आणि अवयव तस्करी रोखण्यापुरती मर्यादित न ठेवता विशेषतः चंद्रपूर जिल्ह्यातील जंगलाजवळील गावातील गावकऱ्यांवर सातत्याने होणाऱ्या वाघांचे हल्ले याचा बंदोबस्तही या मार्वल कंपनीच्या माध्यमातून Al तंत्रज्ञानाच्या सहाय्याने करण्याकरीता शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक (१७-०६-२०२६) :** (१) व (२) या प्रकल्पांतर्गत बफर क्षेत्रामध्ये मानव वन्यजीव संघर्ष टाळणे या मोठ्या आव्हानाचा सामना करण्याचा उद्देश व कृत्रिम बुध्दिमत्तेचा (Artificial Inteligence) चा वापर करुन कायद्याची अंमलबजावणी अधिक प्रभावी पध्दतीने करण्यासंदर्भात आवश्यक असलेली कृत्रिम बुध्दिमत्ता यंत्रणा बसविणेकरीता गृह विभागाच्या दिनांक २५ एप्रिल, २०२५ च्या शासन निर्णयानुसार मार्वेल ही शासकीय कंपनी स्थापन केली आहे.

ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर जंगलाजवळील गावातील गावकऱ्यांवर होणाऱ्या वाघांचे हल्ले रोखण्याकरीता खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहे :-• व्याघ्र प्रकल्पाच्या क्षेत्रात M-Stripe या विशेष पेट्रोलिंग ॲप्लिकेशनद्वारे नियमितपणे GPS आधारित गस्त घातली जाते, ज्यामध्ये वाघ आणि वन्य प्राण्यांच्या प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष खुणा नोंदवण्याची सुविधा आहे.

• विशेषत: शिकार प्रतिबंधक गस्तीसाठी राखीव क्षेत्रात विशेष व्याघ्र संरक्षण (STPF) कार्यरत आहे.
• कॅमेरा ट्रॅप्सचा वापर करून वाघांच्या संख्येचे नियमित निरीक्षण केले जाते.
• गवताळ प्रदेशाचा विकास आणि तण काढून नियमित अधिवास व्यवस्थापन केले जाते.
• पाण्याची उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी आणि शिकारीची शक्यता टाळण्यासाठी राखीव क्षेत्रातील जलाशयांचे नियमित निरीक्षण केले जाते.
• व्याघ्र प्रकल्पात शुन्य आग या उद्देशाने FSI अलर्ट सिस्टम, NASA FIRMS आणि इतर स्रोतांद्वारे समर्पित अग्निशमन नियंत्रण कक्षाद्वारे रिअल-टाइम वनवा मॉनिटरींग केले जाते.
• मानव-वन्यजीव संघर्ष कमी करण्यासाठी AI (कृत्रिम बुध्दिमत्ता) तंत्रज्ञानाचा वापर केला जातो. मानवी वस्त्यांजवळ वन्य प्राण्यांच्या हालचालींचा रिअल-टाइम सूचना देण्यासाठी २० गावांमध्ये एकूण ७१ AI कॅमेरे बसविण्यात आले आहेत.
• मानव-वन्यजीव संघर्ष कमी करण्यासाठी गाव पातळीवर आवश्यक प्रशिक्षण आणि उपकरणांसह एकूण ५० प्राथमिक प्रतिसाद पथके (PRT) स्थापन करण्यात आली आहेत.
• व्याघ्र संवर्धनाबद्दल व्याघ्र प्रकल्पाभोवतीच्या लोकांना शिक्षित करण्यासाठी नियमितपणे निसर्ग शिक्षण शिबीरे आणि उपक्रम आयोजित केले जातात.
• पर्यायी उपजिवीकेचे साधन शोधण्यासाठी स्थानिकांना विविध कौशल्य प्रशिक्षण दिले जाते.
• जंगल सफारी, नौकाविहार, सायकलिंग, फुलपाखरू उद्यान इत्यादी विविध पर्यावरण-पर्यटन उपक्रमांद्वारे मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध करून दिला जातो.
• राखीव क्षेत्रात वाघ आणि इतर प्राण्यांवर राज्यातील वाघांचे दिर्घकालीन निरीक्षण यासारख्या प्रकल्पांसह विविध संधोधन प्रकल्प सुरू आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात जिल्हाधिकारी यांच्या अधिपत्याखालील अतिक्रमित जमिनी नियमित करणेबाबत

**(९) ५७९२ (१४-१२-२०२५) श्री.सदाशिव खोत, श्रीमती उमा खापरे, श्री.अमित गोरखे, श्रीमती चित्रा वाघ, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सन २०११ पर्यंतची अतिक्रमणे नियमित करण्याच्या निर्णयानुसार मोहिमेदवारे सरकारी जमिनीवरील ५०० चौरस फुटापर्यंतची निवासी अतिक्रमणे मोफत नियमित करण्यात येणार असून उर्वरित अतिक्रमणे बाजार मूल्यानुसार दंड आकारून नियमित करण्याची घोषणा मा.महसूल मंत्री महोदयांनी माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये केली असून यामुळे राज्यातील सुमारे ३० लाख अतिक्रमणधारकांना याचा लाभ होणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात जिल्हाधिकारी अधिपत्याखालील जमिनी वन जमिनी, गायरान जमिनी, झेडपी जंगले या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर अतिक्रमणे अस्तित्वात आहेत ही अतिक्रमणे नियमित करून त्यातून स्थानिक स्वराज्य संस्थांना मालमत्ता कराच्या माध्यमातून महसूल उपलब्ध करून देण्यासह गावांच्या वाढीसाठी गावठाण निर्माण करण्यात येणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या अनुषंगाने शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे (२३-०६-२०२६) :** (१) व (२) शासन निर्णय दिनांक २५/०३/२०२६ अन्वये दिनांक ०१/०१/२०११ रोजी किंवा त्यापूर्वी शासकीय जमिनीवर झालेली व सध्या अस्तित्वात असलेली १५०० चौ. फूटांपर्यंत असलेली निवासी प्रयोजनासाठी अतिक्रमणे नियमानुकूल करण्याबाबत निर्णय घेण्यात आला असून त्यानुसार पहिले ५०० चौ. फूटांपर्यंतची अतिक्रमणे विनामुल्य नियमानुकूल करण्याबाबत तर ५०० चौ. फूटांपुढील १५०० चौ. फूटांपर्यंत असलेली अतिक्रमणे बाजारमूल्याच्या १० टक्के इतकी रक्कम आकारुन नियमानुकूल करण्यात येणार आहेत.

तसेच सदर शासन निर्णयानुसार दिनांक ०१/०१/२०११ पर्यंत गायरान जमिनीवरील भूमिहिन शेतमजुर, अनुसूचित जाती तसेच अनुसूचित जमातीच्या व्यक्तींनी निवासी प्रयोजनासाठी केलेली अतिक्रमणे नियमानुकूल न करता सदर अतिक्रमण धारकांना प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत निवास उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने सदर गायरान जमीन ही वैयक्तिक लाभार्थ्यांना प्रदान न करता ती संबंधित स्थानिक नियोजन प्राधिकरण/ स्थानिक स्वराज्य संस्था यांना उपलब्ध करुन देण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे.

तसेच, दिनांक ०१/०१/२०११ पूर्वीचे शासकीय जमिनीवरील अतिक्रमण नियमानुकूल करणे हे कोणत्याही परिस्थितीत शक्य नसल्यास उदा. (नदी, नाले च्या पूररेषेतील अतिक्रमणे, वन, सीआरझेड, एनडीझेड, रेल्वे मार्ग, महामार्ग, विद्युत वाहिन्या इ.) अशी अतिक्रमणे नियमानुकूल करण्यात येऊ नये. तथापि, अशी कुटूंबे निवाऱ्यापासून वंचित होऊ नये यासाठी संबंधित सक्षम प्राधिकारी यांनी अशा सर्व पात्र कुटूंबांची गावनिहाय यादी करुन त्यांना प्रधानमंत्री आवास योजनेतून घरे उपलब्ध करुन देण्यात यावी अथवा ग्रामीण भागामध्ये महसूल मंडळ स्तरावर गावनिहाय पात्र कुटूंबाची यादी तयार करुन शक्य तो मोठ्या महसूल गावाच्या जवळील शासकीय जमिनीवर भूखंड उपलब्ध करुन सदर कुटूंबाना १००० चौ. फुट क्षेत्राचे भूखंड देऊन वसविण्यात यावे, अशी तरतूद करण्यात आली आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील पादंण रस्त्यांकरीता वापरण्यात येणाऱ्या मुरुमाची रॉयल्टी माफ करणेबाबत

**(१०) ५८२६ (१४-१२-२०२५) श्री.सदाशिव खोत, श्रीमती उमा खापरे, श्री.अमित गोरखे, श्रीमती चित्रा वाघ, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शेतकऱ्यांसाठी शेतामध्ये पेरणी, आंतरमशागत, कापणी, मळणी इत्यादी कामांसाठी तसेच शेतीमाल बाजारात पोहचविण्यासाठी बारमाही शेतरस्ते असणे अत्यंत आवश्यक असून शेत पाणंद रस्ते मोठ्या प्रमाणात ग्रामपंचायत स्वतःच्या फंडातून किंवा लोक वर्गणीतून किंवा शासकीय फंडातून तयार केले जातात, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अनेक शेतकऱ्याना पाणंद रस्ते स्वखर्चात तयार करणे शक्य व्हावे याकरीता पाणंद रस्ते बनविण्यासाठी मुरमाची रॉयल्टी माफ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे (१५-०६-२०२६) :** (१), (२) ग्रामीण भागात शेत/पाणंद रस्त्यांची असलेली आवश्यकता, त्यांचे महत्व व सद्यःस्थितीत शेत/पाणंद रस्त्याच्या कामांकरीता मनरेगा अंतर्गत येणाऱ्या अडचणी विचारात घेता पूर्णपणे यंत्रसामुग्रीचा वापर करुन शेत/पाणंद रस्ते तयार करण्यासाठी महसूल विभागामार्फत "मुख्यमंत्री बळीराजा शेत/ पाणंद रस्ते योजना" ही स्वतंत्र योजना राबविण्यास मंत्रिमंडळाने दिनांक ०७/१२/२०२५ रोजी झालेल्या बैठकीत मान्यता दिलेली आहे. याअनुषंगाने दिनांक १४/१२/२०२५ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे.

दिनांक १४/१२/२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये, "महसूल विभागाच्या शासन निर्णय दिनांक ०३ एप्रिल, २०२५ मधील सूचनांनुसार शेत/पाणंद रस्त्यासाठी गाळ/माती/मुरुम/दगड इत्यादी गौण खनिजासाठी कोणतेही स्वामित्व शुल्क आकारण्यात येवू नये" अशी तरतूद करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ओळखपत्रधारक विणकरांना शासकीय योजनांचा लाभ व वयोवृध्द पैठणी हातमाग विणकरांसाठी पेन्शन योजनेचा लाभ देण्याबाबत

**(११) ६६११ (१८-०३-२०२६) श्री.पंकज भुजबळ, श्री.इद्रिस नायकवडी :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या वस्त्रोद्योग विभागामार्फत सर्वेक्षण करून ओळखपत्र वितरीत करण्यात आलेल्या विणकरांना उत्सव भत्ता व तत्सम सर्व शासकीय योजनांचा लाभ देण्याबाबत शासनाने निर्णय घ्यावा, अशी मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक ९ सप्टेंबर, २०२५ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वयोवृध्द पैठणी हातमाग विणकर बांधवांना वृद्धापकाळ पेन्शन योजना लागू करावी, अशी मागणी लोकप्रतिनिधी तसेच विविध विणकर संघटनांनी दिनांक ५ सप्टेंबर २०२५ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय सावकारे (०३-०७-२०२६) :** (१) होय. तथापि, हातमाग विणकरांचे सर्वेक्षण करुन पात्र विणकरांना ओळखपत्र देण्याबाबतची कार्यवाही राज्य शासनाच्या वस्त्रोद्योग विभागामार्फत करण्यात येत नसून ती वस्त्रोद्योग मंत्रालय, भारत सरकार अंतर्गत विणकर सेवा केंद्र यांचेकडून करण्यात येते. सदर ओळखपत्र प्राप्त हातमाग विणकरांना उत्सव भत्ता व तत्सम शासकीय योजनांचा लाभ राज्य शासनामार्फत देण्यात येतो.

(२) होय.

(३) वस्त्रोद्योग मंत्रालय, भारत सरकार अंतर्गत विणकर सेवा केंद्र, मुंबई व नागपूर यांचेमार्फत चौथ्या हातमाग जनगणनेंतर्गत सर्वेक्षण सुरु आहे. विणकर सेवा केंद्र यांचेकडून नव्याने ओळखपत्र वितरीत करण्यात आलेल्या पात्र हातमाग विणकरांना एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण, २०२३-२८ अंतर्गत गणेश चतुर्थी निमित्त उत्सव भत्ता, २०० युनिटपर्यंत मोफत वीज, या योजनांचा लाभ देण्याकरीता निधी मागणीचे प्रस्ताव शासनास प्राप्त झाले आहेत. सदर प्रस्तावांच्या अनुषंगाने आवश्यक अतिरिक्त माहिती आयुक्त (वस्त्रोद्योग), वस्त्रोद्योग आयुक्तालय, नागपूर यांचेकडून मागविण्यात आली असून सदर माहिती प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

तसेच, पारंपारिक वस्त्रोद्योग विणकरांना सामाजिक सुरक्षा कवच देण्यासाठी वयाचे ६० वर्षे पूर्ण झाल्यानंतर त्यांच्यासाठी "वृध्दावस्था निवृत्ती वेतन योजना" तयार करण्याबाबतचा मंत्रिमंडळ प्रस्ताव वित्त विभागाच्या अभिप्रायार्थ सादर करण्यात आला होता.सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने वित्त विभागाने काही मुद्दे उपस्थित केले असून सदर मुद्द्यांची माहिती आयुक्त (वस्त्रोद्योग), वस्त्रोद्योग आयुक्तालय, नागपूर यांचेकडून मागविण्यात आली आहे. सदर माहिती प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## शासनाच्या शबरी घरकुल योजनेतील अनुदानात वाढ करण्याबाबत

**(१२) ६८७२ (२५-०३-२०२६) श्री.विक्रम काळे, श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.इद्रिस नायकवडी, श्री.सतिश चव्हाण, श्री.संजय खोडके, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.पंकज भुजबळ :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या आदिवासी विकास विभागामार्फत राज्यात शबरी घरकुल योजना राबविण्यात येत असून शबरी घरकुल योजनेंतर्गत मिळणाऱ्या निधीत वाढ करुन, हा निधी रुपये ३ लाख ५० हजार मिळावा अशी मागणी विदर्भ आदिवासी विद्यार्थी व महिला संघटनेने दिनांक ११ डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान शासनाकडे केली असून त्याबाबतचे निवेदन मा.आदिवासी विकास मंत्री यांनाही देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने लाभार्थ्यांकडून करण्यात आलेली मागणी लक्षात घेऊन शबरी घरकुल योजनेच्या निधीत वाढ करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक ऊईके (१७-०६-२०२६) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) सद्य:स्थितीत, ग्रामविकास विभागाच्या दिनांक ०४/०४/२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये सन २०२४-२५ ते सन २०२८-२९ या कालावधीसाठी राज्यातील, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, आदिवासी विकास विभाग व इतर मागास बहुजन कल्याण विभाग यांचेकडून राबविण्यात येणाऱ्या राज्यपुरस्कृत घरकुल योजनांचा (शबरी आदिवासी घरकुल योजना सहित) लक्षांक प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) टप्पा-२ अंतर्गत देण्यात येणार असून लाभार्थ्यांना देण्यात येणाऱ्या अनुदानात राज्य

हिश्श्यातून रुपये ५०,०००/- एवढी अतिरिक्त वाढ करण्यात आली आहे. तसेच ह्या राज्यपुरस्कृत घरकुल योजनांतर्गत याआधी देण्यात आलेल्या उद्दिष्टांकरीता असलेले दायीत्व पूर्ण करण्यात येणार असून यापुढे स्वतंत्रपणे नव्याने वेगळे उद्दिष्ट देण्यात येणार नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सहकारी उपसा जलसिंचन संस्थांच्या योजनांचे थकीत कर्ज व्याजासह माफ करण्याच्या प्रस्तावाबाबत

**(१३) ७०९३ (१८-०३-२०२६) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके, श्री.अमित गोरखे : तारांकित प्रश्न क्रमांक ५४६९ ला दिनांक ८ डिसेंबर, २०२५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील उपसा जलसिंचन संस्थांच्या थकीत कर्जाच्या जप्तीची कार्यवाही तूर्तास करू नये, अशा आशयाचे शासनाचे दिनांक १६ ऑक्टोबर, २०२५ रोजीचे पत्र संबंधित बँकांना निर्गमित करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भारतीय रिझर्व बँकेच्या दिनांक ३१ डिसेंबर, २०२४ रोजीच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यात कर्जमाफी योजना राबविण्यात आल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी राज्य शासनावर राहणार असल्याने, सहकारी उपसा जलसिंचन संस्थांच्या योजनांचे थकीत कर्ज व्याजासह माफ करावे लागेल, असा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रस्ताव लवकरात लवकर मंजूर करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही व कालबध्द उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाबासाहेब पाटील (२९-०६-२०२६) :** (१) खरे आहे.
राज्यातील सहकारी उपसा जलसिंचन संस्थांच्या थकीत कर्जाच्या जप्तीची कार्यवाही तूर्तास करु नये, अशा सूचना संबंधित बँकाना देण्याबाबत शासनाचे दिनांक १६/१०/२०२५ रोजीच्या पत्रान्वये सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे यांना कळविण्यात आले आहे.
(२) अंशत: खरे आहे. तथापि, भारतीय रिझर्व्ह बँकेने दिनांक ३१/१२/२०२४ च्या मार्गदर्शक सूचना मागे घेतल्या असून दिनांक २८/११/२०२५ रोजी नव्याने मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. सदर २८/११/२०२५ रोजीच्या सूचनांतील Chapter VII Government Debt Relief Schemes (DRS) विचारात घेऊन उपसा सिंचन योजनांची कर्जमाफीचा निर्णय घेणे आवश्यक आहे.
(३) भारतीय रिझर्व्ह बँकेच्या दिनांक २८/११/२०२५ च्या मार्गदर्शक सूचना विचारात घेऊन सहकारी उपसा जलसिंचन योजनांच्या थकीत कर्जमाफीचा सुधारित प्रस्ताव मा.मंत्रिमंडळास सादर करण्याकरीता नियोजन व वित्त विभागास अभिप्रायार्थ सादर करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे चिंचघर (ता.वाडा, जि.ठाणे) परिसरात दगडखाणींचे कामामुळे आसपासच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना त्रास होत असल्याबाबत

**(१४) ७१७४ (२५-०३-२०२६) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.विक्रांत पाटील, श्रीमती चित्रा वाघ, श्री.सदाशिव खोत, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे चिंचघर (ता.वाडा, जि.ठाणे) परिसरात दगडखाणींचे काम मोठ्या प्रमाणात सुरू असून दगडखाणींच्या कर्णकर्कश आवाजामुळे होणारा त्रास, आसपासच्या शाळाना हादरे व विद्यार्थ्यांच्या कानाचे दडे बसत असून त्यांचे कान बधिर होण्याची भिती निर्माण झाली असून दगडखाणींतून ये-जा करणाऱ्या गाड्यांमुळे विद्यार्थ्यांना शाळेत जाणे अवघड झाले असल्याचे माहे डिसेंबर,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू भागातील दगडखाणींचे काम तातडीने थांबवून परिसरातील विद्यार्थ्यांचा त्रास कमी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे (१८-०६-२०२६) :** (१) व (२) हे खरे नाही.

मौजे-चिंचघर, ता.वाडा, जि.पालघर येथील स्टोन क्रशर व खदानी ह्या सदर परिसरामधील जिल्हा परिषद शाळा, ह. वि. पाटील विद्यालय, नॅशनल इंग्लिश स्कूल शाळेच्या साधारण १.५ की. मी व त्यापेक्षा जास्त अंतरावर आहेत. तसेच,तालुका आरोग्य अधिकारी यांच्या अहवालामध्ये विद्यार्थ्यांना कानाचे व श्वासाचे आजार नसलेबाबत स्पष्टपणे नमुद केलेले आहे.सार्वजनिक सुरक्षितता व वाहतूककोंडी सोडविण्याच्या दृष्टीकोनातून पोलीस निरीक्षक वाडा यांना तहसिलदार, वाडा यांनी दिनांक ०१/०१/२०२६ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील मानव वन्यजीव संघर्षग्रस्त माकडे/वानरे यांना पकडण्यासाठीची कार्यप्रणाली सुनिश्चित करण्याच्या शासन निर्णयामध्ये सुधारणा करण्याबाबत

**(१५) ७३०४ (२५-०३-२०२६) श्री.धीरज लिंगाडे, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.सुधाकर अडबाले, श्री.जयंत आसगावकर, श्रीमती चित्रा वाघ :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रामीण व शहरी भागांमध्ये माकडांच्या हल्ल्यांचे प्रमाण वाढले असून शेत शिवार वस्ती शाळा बाजारपेठा व सार्वजनिक ठिकाणी माकडांचा उपद्रव वाढल्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून संघर्षग्रस्त माकडे/वानरे यांना बचावाकरीता पकडणे व अधिवासात सोडणे, याकरता कार्यप्रणाली सुनिश्चित करण्याबाबत शासनाने दिनांक २५ नोव्हेंबर,२०२५ रोजी निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निर्णयामध्ये माकडे पकडण्यासाठी दहा हजारापेक्षा जास्त मर्यादा वाढवावी, गाडी भाडे, माकड वाहतूक ट्रान्सपोर्टींग त्यांना जंगलात नेऊन सोडण्यासाठी अधिक गाडीभाडे मिळावे, प्रत्येकी एक

माकड पकडण्यासाठी ६०० रुपये मिळावेत, यामध्ये संख्येची अट नसावी, वानर/माकड पकडून किमान ४० ते ५० कि.मी.अंतराने नेऊन सोडावे, जेणेकरुन माकडे गावात परत येणार नाही, अशा सुधारणा करणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त सुधारणा करुन नवीन शासन निर्णय जारी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली व या समस्येवर नियंत्रण मिळवण्यासाठी शासनामार्फत कोणत्या उपाययोजना राबविण्यात आल्या वा राबविण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक (२२-०६-२०२६) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) माकड/वानर पकडण्यासाठीच्या प्रयोजनार्थ निश्चित करण्यात आलेल्या दरांमध्ये माकड/वानर बचावाकरीता सुरक्षितपणे पकडल्यास आणि सोडल्यास सरसकट रुपये ६०० प्रती माकड यानुसार दर अदा करण्याबाबत दिनांक २२/०४/२०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये सुधारणा करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात इतर राज्याप्रमाणे अनुसूचित जाती उपवर्गीकरण अ, ब, क व ड लागू न केल्याने मातंग समाजाला लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण मिळत नसल्याबाबत

**(१६) ७३२५ (२५-०३-२०२६) श्री.अमित गोरखे, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत : दिनांक १४ डिसेंबर, २०२५ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक २२ मधील प्रश्न क्रमांक ४१२९ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात इतर राज्याप्रमाणे अनुसूचित जाती उपवर्गीकरण अ, ब, क व ड लागू न केल्याने मातंग समाजाला लोकसंख्येच्या प्रमाणात पुरेशे आरक्षण मिळत नसल्याने हा समाज प्रशासकीय शैक्षणिक आणि रोजगार व राजकीय क्षेत्रात मागे राहत असल्याने या समाजाने हिवाळी (नागपूर) अधिवेशन, २०२५ मध्ये विधानभवनावर दिनांक १२ डिसेंबर, २०२५ रोजी भव्य मोर्चा काढून शासनास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मोर्चेकरांनी राज्यात व्हिजेएनटीच्या आरक्षणाचे जसे उपवर्गीकरण आहेत या पध्दतीने शेजारील तेलंगना राज्याने अनुसूचित जातीचे उपवर्गीकरण अ, ब, क आणि ड प्रमाणे केल्याने ते उपवर्गीकरण राज्यातील मातंग समाजाला देण्याच्या मागणीसह अन्य मागण्या केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय शिरसाट (२३-०६-२०२६) :** (१) व (२) यासंदर्भात दिनांक १३ डिसेंबर, २०२५ रोजी शासनास निवेदन प्राप्त झाले आहे.

(३) मा.न्यायमूर्ती अनंत मनोहर बदर समितीने शासनास दिनांक १६ मार्च, २०२६ रोजी सादर केलेल्या अहवालावर मा.मंत्रिमंडळाने मा.मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करून संबंधितांची सुनावणी घेण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार संबंधितांना BARTI, पुणे कार्यालयाच्या ई-मेल आयडी वर अर्ज/निवेदने सादर करण्यासाठी ३० एप्रिल २०२६ पर्यंत मुदत देण्यात आली होती. त्यानुसार अनुसूचित जातींच्या आरक्षणात उपवर्गीकरण करण्याच्या विषयाबाबत प्राप्त झालेल्या अर्ज/निवेदनांच्या अनुषंगाने मा.मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या समितीमार्फत शासनास अहवाल सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे. त्यानंतर शासन स्तरावरून पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील शाळा / तुकडीवर कार्यरत शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन नियमित करण्याबाबत

**(१७) ७५२६ (२४-०३-२०२६) श्री.सुधाकर अडबाले : तारांकित प्रश्न क्रमांक २३४५७ ला दिनांक २८ जून, २०२४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आदिवासी उपयोजन क्षेत्रातील (लेखाशीर्ष १९०१) शाळा / तुकडीवर कार्यरत शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन अनुदानाअभावी नियमित होत नसल्याचे माहे जानेवारी, २०२६ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आदिवासी उपयोजन क्षेत्रातून बिगर आदिवासी उपयोजन क्षेत्रामध्ये रूपांतरीत करून नियमित वेतन अनुदान मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (०२-०७-२०२६) :** (१) हे खरे नाही.
(२) वित्त विभागाच्या दिनांक २७ जानेवारी, २०१७ च्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र. ६ नूसार आदिवासी उपयोजना राबविणाऱ्या ज्या आस्थापना आहेत, त्यांचेसाठी उपलब्ध होणारा निधी हा कार्यक्रमांवरील खर्चाकडे वर्ग करण्यात येईल असे निर्देश देण्यात आले असल्यामुळे सदर योजना अनिवार्य खर्चात समाविष्ट करता येत नाहीत. तथापि, उपरोक्त अनुषंगाने सदरच्या योजना अनिवार्य खर्चात समाविष्ट करण्याबाबतचा प्रस्ताव शालेय शिक्षण विभागामार्फत आदिवासी विकास विभागास सादर करण्यात आला असून, त्यानुषंगाने पाठपुरावा करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पलूस तहसिल कार्यालयामध्ये (जि.सांगली) मूलभूत सोयीसुविधांचा अभाव असल्याबाबत

**(१८) ७५६४ (२५-०३-२०२६) श्री.अरुण लाड :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पलूस तहसिल कार्यालयामध्ये (ता.पलूस, जि.सांगली) मूलभूत सोयीसुविधांचा पूर्णपणे अभाव असल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले असून नागरिकांसाठी शासनाच्या निधीतून बसविलेली पाणीपुरवठा एटीएम यंत्रणा पूर्णपणे निष्क्रीय झाल्यामुळे नागरिकांसमोर पिण्याच्या पाण्याची समस्या निर्माण झाली असून या परिसरात शौचालयांची दुरावस्था होऊन दुर्गंधी पसरल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तहसिलदार आणि नायब तहसिलदार यांचे निवासस्थान वर्षानुवर्षे बंद असल्याने इमारतीची पडझड झाली असून कार्यरत अधिकारी भाड्याच्या इमारतीत राहत असल्यामुळे शासनाच्या निधीचा अपव्यय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने तालुकास्तरीय महत्वाच्या तहसिल कार्यालयात नागरिकांना मूलभूत सुविधा न पुरविणाऱ्या जबाबदार अधिकाऱ्यांवर कार्यवाही करुन पलूस तहसिल कार्यालयाची तातडीने दूरूस्ती, तहसिलदार आणि नायब तहसिलदार यांचे निवासस्थान, कार्यालय परिसर स्वच्छता आणि आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे (१६-०६-२०२६) :** (१) हे खरे नाही.

पलूस तहसिल कार्यालयामध्ये (ता.पलूस, जि.सांगली) नागरिकांसाठी शासनाच्या निधीतून बसवलेली पाणीपुरवठा एटीएम यंत्रणा ही मागील ५-६ वर्षापूर्वीची असल्याने सदर यंत्रणा तांत्रिक अडचणीमुळे पूर्णपणे निष्क्रीय झालेली होती. नागरिकांसमोर पिण्याच्या पाण्याची समस्या निर्माण झाली होती. त्या कालावधीमध्ये तात्पुरते पिण्याचे पाण्याचे जार उपलब्ध करुन देण्यात आले होते. तद्नंतर १०० दिवसाच्या कार्यक्रमामध्ये तहसिलदार कार्यालय, पलूस यांना आर.ओ. ची नवीन यंत्रणा बसविणेत आलेली आहे व पिण्याचे पाण्याची व्यवस्था सध्या सुस्थितीत आहे.

पलूस तहसिल कार्यालय परिसरात शौचालयाचे नूतनीकरणाचे काम सुरु असून सद्य:स्थितीत ९० % काम पूर्ण झाले आहे. काम अंतिम टप्प्यात असल्याने सद्य:स्थितीत कोणतीही दुरावस्था अथवा दुर्गंधी पसरलेली नाही.
(२) तहसिलदार व नायब तहसिलदार यांचे निवासस्थान वर्षानुवर्षे बंद असलेल्या इमारतीचे नूतनीकरण करणेचे काम सद्य:स्थितीत सुरु असून नूतनीकरणाचे काम पूर्ण झाल्यानंतर कार्यरत अधिकारी वास्तव्यास जातील.
(३) पलूस तहसिल कार्यालयात नागरिकांना मूलभूत सुविधा, कार्यालयाची दुरुस्ती, तहसिलदार आणि नायब तहसिलदार यांचे निवासस्थान व कार्यालय परिसरात स्वच्छता व आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्याबाबतचे कामकाज सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सैनिक स्कूलमध्ये प्रवेश मिळालेल्या आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना लागू करण्याबाबत

**(१९) ७५९२ (२५-०३-२०२६) श्री.सदाशिव खोत, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके, श्री.अमित गोरखे, श्रीमती चित्रा वाघ :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विभागामार्फत आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांसाठी नामांकित इंग्रजी माध्यम शाळांमध्ये प्रवेश देण्याची योजना राबविण्यात येत असून या योजनेंतर्गत पात्र विद्यार्थ्यांना शासनाकडून शिष्यवृत्ती स्वरूपात आर्थिक सहाय्य देण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासनाच्या संरक्षण मंत्रालयामार्फत राज्यामध्ये इंग्रजी माध्यम असलेले सैनिक स्कूल्स स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली असून शाळांमध्ये विद्यार्थ्यांना सैनिकी शिक्षणाबरोबरच NDA, JEE, NEET आदी राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा परीक्षांसाठी दर्जेदार शिक्षण दिले जाते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संरक्षण मंत्रालय मान्यताप्राप्त सैनिक स्कूलमध्ये प्रवेश घेणाऱ्या आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांना "नामांकित इंग्रजी माध्यम शाळा प्रवेश योजने " प्रमाणेच शिष्यवृत्तीचा लाभ देण्यासंदर्भात तसेच गुणवत्तापूर्ण शिक्षण व सैनिकी प्रशिक्षणाच्या माध्यमातून उन्नतीची नवी संधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक ऊईके (२४-०६-२०२६) :** (१) अंशतः खरे आहे.

आदिवासी विभागाकडून अनुसूचित जमातीतील विद्यार्थ्यांकरीता नामांकित इंग्रजी माध्यम शाळांमध्ये प्रवेशाची योजना राबविण्यात येते. तथापि, सदर योजनेमध्ये पात्र विद्यार्थ्यांना शासनाकडून शिष्यवृत्ती देण्यात येत नाही. पात्र विद्यार्थ्यांच्या शिक्षण व अन्य सुविधांकरीता शाळांच्या गुणांकनानुसार विहीत शुल्क शाळांना अदा केले जाते.

(२) होय.

(३) नामांकित शाळा योजनेंतर्गत मान्यता मिळणेकरीता इच्छुक असणाऱ्या व विहित निकष पूर्ण करणाऱ्या शाळांनी अर्ज सादर करणे आवश्यक आहे. शाळांचे नामांकित योजनेंतर्गत मान्यतेकरीता अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्याअनुषंगाने पुढील नियमोचित कार्यवाही करण्यात येते.

(४) प्रश्न उध्दभवत नाही.

---

## तासखेडा (ता.रावेर, जि.जळगाव) शिवारातील हतनूर कालव्याची माती अनधिकृतपणे विक्री केल्याबाबत

**(२०) ७६८१ (२५-०३-२०२६) श्री.एकनाथराव खडसे : तारांकित प्रश्न क्रमांक ५४३६ ला दिनांक ११ डिसेंबर, २०२५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तासखेडा (ता.रावेर, जि.जळगांव) शिवारातील हतनूर कालव्याची माती अनधिकृतपणे उत्खनन करून केलेल्या विक्री प्रकरणी दिनांक २० नोव्हेंबर, २०२५ रोजी गुन्हा दाखल करणेबाबत पत्र व्यवहार करूनही अद्यापपर्यंत त्यावर कोणतीही कार्यवाही झाली नसल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने अवैध उत्खनन प्रकरणी संबंधित दोषींवर गुन्हे दाखल होणेसंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे (१८-०६-२०२६) :** (१), (२) व (३) हतनूर कालव्याच्या खोदकामामधून निघालेली अतिरिक्त माती, कालव्याच्या लगत संपादित क्षेत्रामध्ये एकूण ४५६५ ब्रास मातीची अवैध वाहतूक अज्ञात व्यक्तीव्दारे झाल्याबाबत उपविभागीय अधिकारी, पाटबंधारे उपविभाग, सावदा यांनी तहसिलदार रावेर यांना कळविले आहे.

जळगाव जिल्ह्यातील तासखेडा, ता.रावेर शिवारातील हतनूर धरण कालव्यातील मातीचे अवैध उत्खनन / वाहतूक प्रकरणी उपविभागीय अधिकारी पाटबंधारे उपविभाग, सावदा व क्षेत्रिय महसूल यंत्रणा यांचेमार्फत स्थानिक संयुक्त चौकशी करुन पंचासमक्ष पंचनामा केला आहे. सदरील मालमत्ता ही जलसंपदा विभागाच्या मालकीची असल्याने उपविभागीय अधिकारी, पाटबंधारे उपविभाग सावदा यांनी प्रकरणी सावदा पोलीस स्टेशन येथे प्र.ख.क्र.००२३/२०२६ दिनांक २९/०१/२०२६ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.